संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# वैचारिक दुष्काळही असेल तर संमेलनच कशाला?

**राज्यामध्ये** निसर्गाच्या अवकृपेमुळे दुष्काळाची दाहकता आधीच वाढलेली आहे. अशा परिस्थितीत संपूर्ण राज्यात कोणत्याही प्रकारच्या छानछोकीच्या किंवा अनाठायी उत्सव समारंभांना लगाम घालून त्यावर उधळला जाणारा पैसा दुष्काळाकडे वळवण्याची वेळ आलेली आहे. दुष्काळाच्या या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात होत असलेली विविध प्रकारची सभासंमेलने अनाठायी वाटू लागली आहेत. अशा परिस्थितीत पुन्हा यवतमाळमध्ये होऊ घातलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाने आपल्या वैचारिक दुष्काळाचे प्रदर्शन मांडून त्यात मोठीच भर घातलेली दिसते. निसर्गाच्या दुष्काळात विचारांचाही असा दुष्काळ असेल तर अशा प्रकारचे साहित्य संमेलन न भरवलेलेच बरे असे म्हणण्याची वेळ येते. या संमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून इंग्रजी साहित्यात मोठ्या प्रमाणावर लिखाण केलेल्या नयनतारा सहगल यांना आमंत्रित केले गेले आणि नंतर त्यांचे भाषण हे संयोजकांच्या जिव्हारी लागण्याची शक्यता दिसू लागताच या प्रमुख पाहुण्यांना कृपा करून तुम्ही संमेलनाला येऊ नका. आमचं निमंत्रण रद्द समजा असे कळवण्याचा चक्क निर्बुध्दपणा केला गेला. काही दिवसांवर आलेल्या साहित्य संमेलनाच्या प्रमुख पाहुण्यांच्या निमंत्रणावरून निर्माण झालेला हा गदारोळ साहित्य संमेलनाची वाद परंपरा पुढे चालवणाराच ठरला. सहगल यांचे इंग्रजी साहित्यात असलेले योगदान त्यांचा महाराष्ट्राशी असलेला संबंध या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन त्यांना निमंत्रित केले, पण जेव्हा त्यांनी आपले लिखीत भाषण मंडळाकडे पाठवले, त्यावेळेला मंडळाची पाचावर धारण बसली असावी म्हणून आता निमंत्रण मंडळाने रद्द केले. यवतमाळच्या स्थानिक संयोजन समितीने त्यात आडकाठी आणली याचा नीट खुलासा झालेला नाही. परंतु सहगल यांना येऊ नका असे सांगण्याचा असभ्यपणा एकूणच साहित्य संमेलनाच्याच आयोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा ठरतो आणि म्हणूनच विचारांचाच अशा प्रकारचा दुष्काळ साहित्य संमेलनाची यावर्षी तरी गरज नाही. असे प्रतिपादन करायला भाग पाडतो. जे साहित्य संमेलन सामाजिक संस्कृतीच्या उन्नयनासाठी मोलाची कामगिरी करते असा समज आहे. त्याच संमेलनाच्या आयोजनात सुसंवादाच्या किंवा समजुतदारपणाच्या अशा भयंकर उणिवा असतील तर संमेलन आयोजित करण्याचाही नैतिक अधिकार संबंधित मंडळींनी गमावलेला दिसून येतो.

## इथे ओशाळली सभ्यता

सहगल यांना न येण्याचा निरोप मिळाल्यानंतर स्वाभाविकपणे आश्चर्य वाटलेच. परंतु आपल्या भाषणामध्ये त्यांनी ज्या मुद्द्यांचा उल्लेख केला होता, त्याला शोभेशी वागणूकच त्यांना संयोजकांकडून मिळाली. एकदा वाद पेटला आहे म्हटल्यानंतर अनेक जणांच्या त्यात उड्या पडत असतात आणि प्रसिध्दीचा झोतही मिरवून घेतला जातो. मग आता संमेलनावर बहिष्कार टाकण्याची तयारी सुरू झालेली आहे. अशा बहिष्कारापेक्षा संमेलनाचा सगळा खर्चच वाचवणे जास्त संयुक्तिक ठरते. नाहीतरी सध्या महाराष्ट्रात दुष्काळाने चांगलेच डोके वर काढले आहे. ज्या परिसरात संमेलन होणार आहे, त्या विदर्भातही पाण्याची तीव्र टंचाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्या या गोष्टीही घडताना दिसतात. एकीकडे हे चित्र दिसत असताना दुसरीकडे संमेलनातल्या भोजनावळी आणि सजावटीचा जल्लोष तितकाच सवंग वाटू शकतो. नाहीतरी प्रमुख पाहुण्यांना येऊ नका असे कळवून झाले आहेच. आता संपूर्ण संमेलनालाच येऊ नको म्हणून किंवा होऊ नको म्हणून साद घालायला काहीच हरकत नाही. शिवाय सरकारकडे दुष्काळाशी सामना करण्याकरिता पुरेसा पैसाही उपलब्ध नाही. संमेलनासाठी सरकारकडून दिले जाणारे पाचपन्नास लाख रुपये वाचतील, शिवाय संयोजकांकडून होणारा एक दीड कोटीचा खर्च इतर दुष्काळी कामांसाठी वळवता येऊ शकेल. अर्थात तशी इच्छा असेल तरच वळवता येऊ शकेल. दरवर्षी साहित्य संमेलन झालेच पाहिजे, असा काही नियम नाही. खरे तर विचारांची किंवा एकूणच विचारस्वातंत्र्याची अशा प्रकारची दुर्भिक्षता असेल तर दर दोन वर्षांनी एकदाच हा सोहळा झालेला बरा. निदान दोन वर्षांत संयोजनातल्या उणिवा टाळण्याचा प्रयत्न होऊ शकेल. पुढच्या वर्षी याच अध्यक्षांसह आणि जमलं तर त्याच पाहुण्यांसह संमेलन भरवण्याची उदारता व्यक्त करता येऊ शकते.

## कोणते विचार, कोणती कृती, कोणते परिवर्तन?

अनेकांचा असा समज आहे की, साहित्य संमेलन म्हणजे फार मोठ्या आचारविचारांचे आदानप्रदान आणि या बुद्धिवंतांच्या विचारमंथनामुळे मराठी समाजावर फार मोठा वैचारिक परिणाम होतो. किंबहुना ते एक उपकार केल्यासारखेच वातावरण तयार केले जाते. काही हौशागौशा लोकांना साहित्य संमेलन म्हणजे फार मोठी बौध्दिक पर्वणी वाटत असते. मग अध्यक्ष काय विचार मांडतात. प्रमुख पाहुण्यांचे मत काय होते आणि त्यामुळे समाजाला कशी फार मोठी दिशा मिळते असे काहीतरी मनमौजी निष्कर्ष काढले जातात. परंतु आमचे स्पष्ट मत आहे साहित्य संमेलनात बौध्दिक असे काही घडत नाही. केवळ परिसंवाद, चर्चासत्रांमध्ये तीन दिवस प्रत्येक जण आपापली भूक तहान शमवून घेतो. ना अध्यक्षांच्या ना कोणाच्या भाषणाचा समाजावर अथवा राजकारण्यांवर दमडीचा परिणाम होताना दिसत नाही. आमचे असे आवाहन आहे की, गेल्या साठ –सत्तर साहित्य संमेलनामधल्या कोणत्या अध्यक्षांच्या किंवा प्रमुख पाहुण्यांच्या भाषणाचा परिणाम झाला आणि फार मोठे परिवर्तन घडून आले किंवा फार क्रांतिकारक गोष्टी घडल्या, असे दाखवून तरी द्या. एकही उदाहरण शोधून सापडणार नाही. सावरकरांनी 'लेखण्या मोडा, बंदुका हाती घ्या' असे सांगितले होते. एकानेही बंदूक हाती घेण्याचे तर सोडाच, परंतु नावही घेतले नाही. अशा अनेक अध्यक्षांच्या आणि पाहुण्यांच्या भाषणाचा पंचनामा करता येऊ शकतो. तीन दिवस केवळ काही विचार व्यक्त होतात. साधक बाधक चर्चा होते. ठराव पारीत होतात. तीन दिवसांच्या विविध रंजक कार्यक्रमांबरोबर खमंग जेवणाच्या पंक्ती उठतात आणि जो तो आपापल्या घरी जाऊन कामाला लागतो. इतका जर त्याचा मर्यादित संदर्भ असेल तर त्याच्या दरवर्षीच्या आयोजनाची फार शिकस्त न केलेलीच बरी.